**आकाशवाणी मुंबई**
**प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता**
**१७ डिसेंबर २०२४ - मंगळवार**

**<u>ठळक बातम्या</u>**

- एक देश एक निवडणूक विषयीचं विधेयक लोकसभेत सादर
- भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यसभेतल्या चर्चेला आज पुन्हा सुरुवात
- विधानसभेत तालिका सदस्यांची नियुक्ती / विधानपरिषदेत सभापतीपदाची निवडणूक येत्या गुरुवारी होणार
- राज्य विधानसभेत बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगच्या सरपंचाचं हत्या प्रकरण आणि परभणी इथल्या हिंसाचाराच्या मुद्दयावरुन गदारोळ, विरोधकांचा सभात्याग

**आणि**

- बॉर्डर - गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारताला फॉलो ऑन टाळण्यात यश

<><><><>

एक देश एक निवडणूक संदर्भातली दोन विधेयकं आज लोकसभेत मांडण्यात आली. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल विधेयक मांडत असताना विरोधकांनी विधेयक मांडण्यावर मतदानाची मागणी केली. त्यावर २६९ सदस्यांनी विधेयक मांडण्याच्या बाजूने कौल दिला. तर १९८ सदस्यांनी विधेयक मांडण्याला विरोध केला. त्यात काँग्रेस, समाजवादी पार्टी, द्रमुक, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, सीपीआय एम आणि इतर विरोधी खासदारांचा समावेश होता. ही विधेयकं म्हणजे संविधानाच्या मूलभूत ढाच्यावर हल्ला असल्याचं सांगत त्यांचा मसुदा आधी संयुक्त संसदीय समितीकडे तपासण्यासाठी पाठवावा अशी मागणी विरोधी पक्ष सदस्यांनी केली. विरोधकांचे आरोप खोडून काढताना अर्जुन राम मेघवाल यांनी देशाचे पहिले कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विधानाचा दाखला दिला.संविधानाचं संघराज्य स्वरुप कोणीही बदलू शकत नाही असं ते म्हणाले. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या उच्चस्तरीय समितीने एक देश एक निवडणूक संकल्पनेची अभ्यासपूर्ण तपासणी केली असून त्यात सर्व संबंधितांचं आणि तज्ञांचं मत विचारात घेतलं आहे, असं मेघवाल म्हणाले. काँग्रेसचे मनिष तिवारी, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, आणि द्रमुकचे टी आर बालू यांनी आपल्या भाषणात या विधेयकाला विरोध केला.

<><><><>

एक देश एक निवडणूक विधेयकाला काँग्रेस, समाजवादी पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्या सदस्यांनी विरोध केला आहे. संसदेच्या आवारात प्रसारमाध्यमांशी बोलताना विविध पक्षांच्या खासदारांनी याबाबत प्रतिक्रिया दिल्या. एक देश एक निवडणूक विधेयकाला आपल्या पक्षाचा विरोध असून सभागृहात मांडण्यापूर्वी हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे छाननीसाठी पाठवावं अशी पक्षाची मागणी असल्याचं ज्येष्ठ काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी सांगितलं.राष्ट्रवादी कांग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांनी देखील अशीच मागणी केली. हे विधेयक असंवैधानिक असून राज्यांचं महत्त्व कमी करणारं असल्याचा आरोप स. पा. चे धर्मेंद्र यादव यांनी केला. तर हे विधेयक संघराज्याच्या तत्वांच्या विरोधात असल्याचं सीपीआय एम चे जॉन ब्रिटास यांचं म्हणणं आहे.

<><><><>

शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी केंद्र सरकारने सहा कलमी कार्यक्रम तयार केला असल्याची माहिती, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिली. यात उत्पादकतेत वाढ, उत्पादन खर्चात कपात, पिकांना हमीभाव, नैसर्गिक संकटग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, लागवडीत विविधता आणि सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन या मुद्द्यांचा समावेश आहे. वर्ष २००२-२००३ मधे शेतकऱ्यांचं उत्पन्न दरमहा दोन हजार ११५ रुपये होतं. ते २०१८ – १९ या वर्षापर्यंत दरमहा दहा हजार २१८ रुपयांपर्यंत पोहोचलं. त्याखेरीज शेतकऱ्यांना अल्पदराने कर्जपुरवठा, अनुदानित दराने खतं आणि यांत्रिकीकरणाला प्रोत्साहन या उपाययोजनाही करण्यात येत असल्याचं, त्यांनी सांगितलं. गेल्या वर्षभरात शेतकऱ्यांना एकूण २ लाख १४ हजार कोटी रुपये अनुदान देण्यात आलं, तर हमीभावाने विक्रमी खरेदी करण्यात आली, असं चौहान यांनी सांगितलं.

<><><><>

भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यसभेतल्या चर्चेला आज पुन्हा सुरुवात झाली. सभागृहाचे नेते आणि केंद्रीय मंत्री जगतप्रकाश नड्डा यांनी आपल्या भाषणात सांगितलं की भारत केवळ जगातली सर्वात मोठी लोकशाही आहे असं नव्हे तर लोकशाहीची जन्मभूमी देखील आहे. भारतीय संस्कृती आणि परिसंस्थेत स्वातंत्र्य, समता आणि समावेशन तसंच नागरिकांना सन्मानाने जगण्याची संधी ही लोकशाही तत्वं मुळापासून रुजली आहेत असं ते म्हणाले.

<><><><>

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी विधानसभेत तालिका सदस्य म्हणून विजय रहांगडाले, रमेश बोरनारे, शेखर निकम आणि दिलीप सोपल यांची नियुक्ती केल्याचं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी जाहीर केलं. सभागृहाचे माजी सदस्य आणि माजी मंत्री दत्तात्रय राणे यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव अध्यक्षांनी मांडला आणि तो मंजूर झाला. त्यानंतर नुकत्याच मुंबईत झालेल्या तीन दिवसीय विशेष अधिवेशनात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानणारा प्रस्ताव भाजपचे पराग अळवणी यांनी मांडला. यावर सध्या विधानसभेत चर्चा सुरू आहे.

<><><><>

विधान परिषदेच्या सभापतीपदाची निवडणूक येत्या १९ तारखेला होणार असल्याची घोषणा आज सभागृहात करण्यात आली. या निवडणुकीसाठी उद्या म्हणजेच १८ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार आहेत.

<><><><>

विरोधकांनी आज विधानसभेत कामकाज सुरू झाल्यावर परभणी आणि बीड हिंसाचार प्रकरणी स्थगन प्रस्ताव मांडला. परभणीत पोलीस कोठडीत मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या शरीरावर जखमा असल्याचं शवविच्छेदन अहवालात नमूद आहे. त्याला पोलिसांकडून कोठडीत मारहाण झाल्याचा आरोप काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी केला. याप्रकरणी उद्या चर्चा घेण्याचं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी जाहीर केलं. त्यावर नाराज झालेल्या विरोधकांनी सभात्याग करुन दिवसभराच्या कामकाजावर बहिष्कार टाकला. कामकाज सुरू होण्यापूर्वी या मुद्द्यावर विरोधकांनी घोषणाबाजी केली होती.

<><><><>

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी येत्या २५ जानेवारी पासून पुन्हा उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं ते आज वार्ताहरांशी बोलत होते.

<><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांना मंत्रिपद मिळालं नसल्याचा त्यांच्या समर्थकांनी निषेध केला आहे. या संदर्भात आपल्या मतदारसंघात जाऊन, नागरीक, कार्यकर्त्यांशी चर्चा करुन भूमिका जाहीर करणार असल्याचं भुजबळ यांनी म्हटलं आहे. नाराज कार्यकर्त्यांच्या बैठकीनंतर नाशिक इथं ते वार्ताहरांशी बोलत होते. आपल्याला पक्षानं राज्यसभेवर जाण्याबाबत विचारणा केली होती.

मात्र तसं करणं हा आपल्या मतदारसंघातल्या मतदारांचा विश्वासघात ठरेल, असं सांगून त्याला नकार दिल्याचं भुजबळ यांनी सांगितलं.

दरम्यान नाराज  भुजबळ समर्थकांनी काल नाशिकमध्ये आंदोलन केलं. कार्यकर्त्यांनी, भुजबळ यांचा मतदारसंघ असलेल्या येवला तालुक्यात विंचूर इथं रास्ता रस्ता रोको केला, तर नाशिकमध्ये राष्ट्रवादी भवनासमोर घोषणाबाजी केली.

<><><><>

आकाशवाणी मुंबईतर्फे आज लोकगीतांजली या मराठी लोकसंगीताच्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमात पंडित सुरेश बापट आणि धनश्री घैसास हे कलाकार अभंग सादर करतील. तर विनय उत्पात आणि सहकारी हे बैठकीची लावणी तसंच नंदेश उमप आणि सहकारी लोकसंगीत सादर करणार आहेत. हा कार्यक्रम आकाशवाणी मुंबईच्या चर्चगेट इथल्या सभागृहात सायंकाळी पाच वाजता सुरू होईल.

<><><><>

स्मार्टफोन्स च्या निर्यातीत  २०१९  साली  जगात २३ व्या क्रमांकांवर असलेला भारत आता स्मार्टफोन्सचा जगातला तिसरा निर्यातदार देश बनला आहे. नोव्हेंबर मध्ये देशातल्या स्मार्टफोन निर्यातीनं एकाच महिन्यात २० हजार कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि  माहिती तंत्रज्ञान मंत्री  अश्विनी वैष्णव यांनी या यशाचं  मेकिंग भारत स्टोरी  या शब्दांत कौतुक केलं.  उत्पादन आधारित परतावा   धोरणाच्या अंतर्गत चालू आर्थिक वर्षात ७० ते ७५ टक्के निर्यातीचं ठरवलेलं  उद्दिष्ट  यामुळे अगोदरच गाठलं गेलं आहे.

<><><><>

भारत आणि ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर - गावस्कर चषक क्रिकेट कसोटी मालिकेतल्या ब्रिस्बेन इथं सुरु असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात फॉलोऑन टाळण्यात  भारताला यश आलं. मात्र आज चौथ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारत पहिल्या डावात अजूनही १९३ धावांनी पिछाडीवर आहे.

आज सामन्याच्या चौथ्या दिवशी भारतानं कालच्या ४ बाद ५१ धावांवरून आपला पहिला डाव पुढे सुरू केला. मात्र  कर्णधार रोहित शर्मा पुन्हा एकदा अपयशी ठरला. केएल राहुल आणि आणि रवींद्र जडेजा यांच्या लढाऊ अर्धशतकी खेळींनी भारताचा डाव सावरला, त्यानंतर अखेरच्या गड्यासाठी जसप्रित बुमराह आणि आकाशदीप यांनी नाबाद ३९ धावांची भागिदारी करत भारताला फॉलोऑनच्या संकटातून बाहेर काढलं. अपुऱ्या प्रकाशामुळे आजच्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा भारताच्या पहिल्या डावात ९ बाद २५२ धावा झाल्या होत्या.

<><><><>

मुंबई विद्यापीठाचा महिला फुटबॉल संघ अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. राजस्थानमधल्या वर्धमान महावीर मुक्त विद्यापीठ, कोटा इथं  ७  ते ११ डिसेंबर २०२४ दरम्यान झालेल्या पश्चिम विभागीय महिला फुटबॉल स्पर्धेत मुंबई विद्यापीठाच्या महिला फुटबॉल संघानं एम. एल. एस.  विद्यापीठ, उदयपुर  संघाला  ६-० नं हरवलं.

<><><><>